महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Website: maharashatracrimetimes.com  www.facebook.com/maharashtra.c.times  Info@maharashtracrimetimes.com  Twitter- @MHCrimeTimes  Whatsapp -9803386748

मूल्य २/- रुपये

● वर्ष : १२ ● अंक: ०९ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार १ जून २०२१ ते सोमवार ७ जून २०२१ ● RNI. REG. NO. 105858/2010 ● POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2020-2022

## सुविचार

तुम्ही यश तो पर्यंत प्राप्त नाही करु शकत जो पर्यंत तुमच्याकडे अयशस्वी होण्याची हिंमत नाही.

## थोडक्यात

### लवकरच सुटणार सुशांत सिंग रजपूत मृत्यूप्रकरणाचा गुंता?

**नवी दिल्ली (विशेष प्रतिनिधी)**- सुशांत सिंग रजपूतने १४ जून २०२० ला जगाचा निरोप घेतला. त्याच्या निधनाने त्याच्या चाहत्यांना चांगलाच धक्का बसला. त्याच्या निधनाला जून महिन्यात एक वर्ष पूर्ण हाईल. एनसीबीने सुशांत सिंह राजपूत मृत्यू प्रकरणात त्याचा जवळचा मित्र आणि



सहकारी असणाऱ्या सिद्धार्थ पिठानीला काहीच दिवसांपूर्वी अटक केली आणि आता या मृत्यूप्रकरणात आणखी एक अपडेट हाती आली आहे. सिद्धार्थ सिंग रजपूतचा कूक आणि हाऊस हेल्परला पुन्हा चौकशीसाठी बोलवण्यात आले आहे. सिद्धार्थ अंमली पदार्थाचे सेवन करत असल्याचे त्याच्या कूकनेच पोलिसांना सगळ्यात पहिल्यांदा सांगितले होते. याच बाबत एनसीबीने सुशांतचा कूक आणि त्याच्या हाऊस हेल्परला चौकशीसाठी पुन्हा बोलवले आहे.

### सुशील कुमारच्या अडचणीत भर, दिल्लीच्या व्यापाऱ्याने केला गंभीर आरोप

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था):** ऑलिम्पिक मेडलिस्ट कुस्तीपटू सुशील कुमार सध्या ज्युनियर कुस्तीपटू सागर धनखडच्या हत्येच्या आरोपात अटकेत आहे. त्याच्या अडचणीमध्ये रोज वाढ होत आहे. सुशीलवर यापूर्वी गँगस्टरशी संबंध असल्याचा आरोप यापूर्वी झाला आहे. त्यापाठोपाठ दिल्लीतील एका दुकानदारानेसुशीलवर



रविवारी गंभीर आरोप केला आहे. छत्रसाल स्टेडियममध्ये धान्य पुरवल्याबद्दल चार लाखांचे बिल देण्याची मागणी केल्यानंतर सुशील आणि त्याच्या सहकाऱ्याने आपल्याला मारहाण केली,' असा आरोप या दुकानदाराने केला आहे. 'या प्रकरणात दिल्ली पोलिसांनी सुरुवातीला तक्रार दाखल करण्यास टाळाटाळ केली. या सर्व घटनेनंतर आपण घाबरलो होतो, असे त्यांनी सांगितले. सुशील आणि त्याच्या मित्रांना सागर धनखड हत्या प्रकरणात अटक झाल्यानंतर या व्यापाऱ्याने पुन्हा एकदा हा आरोप केला आहे. सुशील कुमार आणि त्याच्या सहकाऱ्यांनी ४ मे रोजी एक फ्लॅटमधून सागर आणि त्याच्या मित्रांचं अपहरण केलं.

# कोरोना काळातही मुंबईची गती आणि विकासाचा वेग मंदावला नाही



**मुंबई (योगेश होळंब) राज्यात कोरोनाच्या पहिल्या लाटेनंतर आलेल्या दुसऱ्या लाटेतही कडक निर्बंध असताना विकासाचा वेग मंदावला नाही. मुंबई शहराला दिशा आणि वेग देणाऱ्या नव्या पिढीच्या विचारांना प्रत्यक्षात उतरविण्यात आल्याने मेट्रोचे काम आखीव रेखीव आणि देखणे झाले आहे. कोरोनाचा धोका अजूनही टळला नाही, गाफील न राहता आयुष्याला ब्रेक लागणार नाही, याची दक्षता घ्या, असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सोमवारी केले.**

डहाणूकरवाडी ते आरे स्थानकादरम्यानच्या मेट्रो मार्गिकांच्या चाचणीचा शुभारंभ, पश्चिम द्रुतगती महामार्ग (टर्मिनल १ अणि २) येथील नियंत्रित प्रवेश भुयारी- उन्नत मार्ग प्रकल्पाचे भूमिपूजन, राजणोली उड्डाण पूल मार्गिका आणि दुर्गाडी पूलाच्या दोन मार्गिकांचा ई लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसुलमंत्री बाळासाहेब थोरात, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले, उद्योगमंत्री सुभाष देसाई, अल्पसंख्याक विकासमंत्री नवाब मलिक, मुंबई शहराचे पालकमंत्री असुम शेख, मुंबई उपनगरचे पालकमंत्री आदित्य ठाकरे, नगरविकास राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर, खासदार राहुल शेवाळे, आमदार झीशान सिद्दीकी आदी यावेळी उपस्थित होते.

पुण्यश्लोक अहिल्या देवी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करून मुख्यमंत्र्यांनी भाषणाला सुरूवात केली. ते म्हणाले, आजचा कार्यक्रम हा या महानगराला दिशा आणि वेग देणारा आहे. वर्षभराहून अधिक काळ कोरोनाचे सावट राज्यावर आहे. मात्र याकाळात उपचारांच्या सुविधा निर्माण करतानाच मुंबईसारख्या वेगवान महानगराचा विकासाचा वेग कमी होऊ दिला नाही. मुंबई वाढतेय तसा तिच्या विकासाचा वेगही कायम राखतोय, असेही त्यांनी सांगितले. विविध पायाभूत आणि दळणवळणाच्या प्रकल्पांमुळे मुंबई जो वेग घेत आहे, त्या प्रवासात मुख्यमंत्री म्हणून सहभागी होता आले असे सांगतानाच मुंबई मेट्रोच काम आखीव-रेखीव आणि देखणे झाले आहे.

## तर निर्बंध आणखी कडक करणार

लॉकडाउनचे निर्बंध १५ जूनपर्यंत कायम राहणार असल्याची घोषणा केल्यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुंबईत होणारी गर्दी पाहून आश्चर्य व्यक्त केलं आहे. इतकंच नाही तर मुंबईत अशीच गर्दी होत राहिली तर आणखी कडक निर्बंध करणार असल्याचा इशाराच उद्धव ठाकरेंनी दिला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणच्या मल्टीप्लीस्टिज पुस्तकाच्या प्रकाशनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. 'आज रस्त्यावरचं ट्राफिक बघून मी आश्चर्यचकित झालो. मी काल नेमकं काय बोललो अशी एकदा चौकशीही केली. मी चुकून सगळी बंधनं उठवली असं तर म्हणालो नव्हतो ना याबद्दल दोघा तिघांना विचारलं. मुंबई किंवा महाराष्ट्रात आपण बंधनं उठवलेली नाहीत. अजूनही करोनाचा धोका संपलेला नाही. जर का आपण गाफील झालो तर संथगतीने सुरु होणाऱ्या आयुष्याला पुन्हा ब्रेक लागेल. मुंबईत पुन्हा अशीच गर्दी होत राहिली तर निर्बंध कठोर करावे लागतील,' असा इशारा उद्धव ठाकरेंनी दिला आहे.



## मराठा समाजाला दिलासा! ठाकरे सरकारचा मोठा निर्णय; १० टक्के EWS आरक्षण

**मुंबई (राकेश गायकवाड)**- सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण कायदा रद्द केल्यापासून पुन्हा एकदा हा मुद्दा चर्चेत आला आहे. यावरून राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी अजूनही झडताना दिसत आहेत. मात्र, आता राज्य सरकारने मराठा समाजाला दिलासा देण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेतल्याची माहिती मिळाली आहे. मराठा समाजाला शिक्षण आणि सरकारी नोकरीमध्ये आर्थिक दुर्बल घटकांच्या १० टक्के आरक्षणाचा लाभ आता घेणार आहे. मराठा समाजाला शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षण देणारा कायदा सर्वोच्च न्यायालयाने रद्द केल्यानंतर राज्यात मराठा समाजातून संतप्त प्रतिक्रिया उमटली होती. यानंतर संभाजीराजे यांनी पुढाकार घेत राज्यव्यापी दौऱ्याला सुरुवात केली.



मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून संभाजीराजेंनी अलीकडेच राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार, मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर यांची भेट घेतली. भाजपही याच मुद्द्यावरून ठाकरे सरकारला घेरण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे. मराठा समाजातूनही सरकारबद्दल नाराजीचा सूर असून, ईडब्ल्यूएस प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणीही होत होती. अखेर राज्य सरकारकडून याबद्दलचा निर्णय घेण्यात आला आहे.

## राज्यातील प्रत्येक पात्र नागरिकाला कोरोना प्रतिबंधक लस देण्यासाठी राज्य सरकार कटीबध्द - उपमुख्यमंत्री

**पुणे (अभिजीत येरल्लु)**-कोरोना प्रतिबंधक लस अधिकाधिक संख्येत उपलब्ध करून देण्याचा राज्य सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत असून राज्यातील प्रत्येक पात्र नागरिकाला लस देण्यासाठी राज्य सरकार कटीबध्द आहे. पुणे जिल्हा लसीकरणात आघाडीवर आहे, असे सांगतानाच पुणे शहरातील हडपसर परिसरात सुरू करण्यात आलेले 'ड्राईव्ह इन व्हॅक्सिनेशन सेंटर' ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग नागरिकांसाठी सुलभ सेवा देणारे ठरेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज व्यक्त केला.

राज्यासह पुणे शहरातील कोरोनाबाधितांची संख्या कमी होत आहे, ही समाधानाची बाब असली तरी संभाव्य तिसऱ्या लाटेचा धोका लक्षात घेत खबरदारी घेण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. हडपसर येथे पहिल्या 'ड्राईव्ह इन व्हॅक्सिनेशन सेंटर'चे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती सभागृहातून ऑनलाईन पद्धतीने केले. त्यावेळी ते बोलत



होते. या कार्यक्रमाला खासदार वंदना चव्हाण (व्हीसीद्वारे), खासदार डॉ.अमोल कोल्हे (व्हीसीद्वारे), आमदार चेतन तुपे, मनपा आयुक्त विक्रमकुमार, अतिरिक्त आयुक्त रुबल अग्रवाल आदी उपस्थित होते. पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचे, विचारांचे स्मरण करुन त्यांना कृतज्ञतापूर्वक वंदन करून उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले की, कोरोना संकटावर मात करण्यासाठी डॉक्टर, नर्सेस आदींसह राज्याची आरोग्य यंत्रणा सर्वशक्तिनिशी लढत आहे.

## अंधेरीच्या 'द ललित'मध्ये नियमबाह्य लसीकरण, कोल्ड चेनऐवजी फ्रीज तर आईस बॅगऐवजी बाटल्यांचा वापर

**मुंबई (दिपेश गोरिवले)**- कोरोनाला रोखण्यासाठी खासगी रुग्णालयांना देण्यात आलेल्या लसीकरणाचा गैरफायदा घेण्याचा प्रकार अंधेरीच्या 'द ललित' हॉटेलमध्ये उघड झाला असून खुद्द महापौर किशोरी पेडणेकर यांनीच या नियमबाह्य लसीकरणाची पोलखोल केली आहे. देशात हॉटेलमध्ये लसीकरणाला परवानगी नसतानाही इथे लसीकरण सुरू हेतेच शिवाय लस साठवण्यासाठी कोल्ड चेनऐवजी फ्रीजचा तर आईस बॅगऐवजी पाण्याच्या बाटल्यांचा वापर सुरू होता. मुंबईत कोरोनाला रोखण्यासाठी राज्य, पालिका, केंद्र सरकार आणि खासगी रुग्णालयांच्या माध्यमातून लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. खासगी रुग्णालयांच्या माध्यमातून नुकतेच खासगी कार्यालये, रहिवासी सोसायट्या आणि मोठ्या रहिवासी संकुलांमध्येही लसीकरण सुरू झाले आहे, मात्र कोणत्याही हॉटेलमध्ये लसीकरणाला परवानगी देण्यात आलेली नाही. असे असताना अंधेरी येथील 'द ललित' या पंचतारांकित हॉटेलमध्ये पॅकेजमध्ये लस दिली जात असल्याचे सोशल मीडियाच्या माध्यमातून महापौर किशोरी पेडणेकर यांना समजले. याची प्रत्यक्ष शहानिशा



करण्यासाठी आज 'हॉटेल ललित'मध्ये आकस्मिक पाहणी केली. यावेळी नियमबाह्य लसीकरण सुरू असून लस साठवणुकीसाठी कोणतीही व्यवस्था नसल्याचे उघड झाले. 'द ललित' हॉटेलमध्ये कोल्ड चेन मेंटेन केली जात नव्हती. घरगुती वापराच्या फ्रीजमध्ये कोरोना लसींचा साठा करण्यात आला होता. आईस बॅग म्हणून पाण्याच्या बाटल्यांचा वापर केला जात होता. त्यामुळे या लसीकरणाच्या सुरक्षिततेबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

## नवी मुंबईत भाजपला धक्का, बड्या नेत्याचा राज ठाकरेंच्या उपस्थितीत मनसे प्रवेश

**नवी मुंबई (धनश्री सट्टा)**- भारतीय जनता पक्षाला नवी मुंबईत मोठा धक्का बसला आहे. कळंबोली उपशहर अध्यक्ष नितीन काळे यांनी मनसेचा झेंडा हाती घेतला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या उपस्थितीत नितीन काळे यांनी मनसेत प्रवेश केला. आगामी नवी मुंबई महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मनसेची ताकद वाढणार आहे. नितीन काळे यांनी भाजपचा हात सोडून मनसेचे इंजिन चालवण्याचा निर्णय घेतल्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. काळे यांच्यामुळे कळंबोलीत मनसेला अधिक ताकद मिळणार आहे. राज ठाकरे यांनी नितीन काळे यांचे स्वागत करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. आगामी नवी मुंबई महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षांतरं महत्त्वपूर्ण मानली जातात. दुसरीकडे, ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातही काही महिन्यांपूर्वी शिवसेनेला मोठे खिंडार पडल्याचं पाहायला मिळालं होतं. मनसेचे ठाणे पालघर जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांच्या उपस्थितीत शेकडो शिवसैनिकांचा मनसेत प्रवेश झाला. तत्पूर्वी कल्याण-



डोंबिवली भागातील शिवसेना आणि भाजपमधील शेकडो कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा झेंडा हाती घेतला होता. माजी आमदार प्रकाश भोईर आणि महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे ठाणे जिल्हा संपर्क प्रमुख वैभव किणी यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला होता. गेल्या वर्षी शिवसेना-युवासेना आणि राष्ट्रवादीच्या वेगवेगळ्या विभागातील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी मनसेचा झेंडा हाती धरला

## 'पवार आणि फडणवीस' या भेटी मागचे संकेत काय? महाराष्ट्राचं राजकारण बदलणार?

**मुंबई (विशाल कारंडे)**- महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष आणि सत्तापालट २०१९ च्या निवडणुकीत सगळ्यांनीच पाहिला आणि त्याचा थरारही अनुभवला आहे. एका दिवसात कशी सत्ता बदलू शकते हे महाराष्ट्राने अगदी जवळून पाहिले आहे. महाराष्ट्रात शिवसेना आणि भाजपाने एकत्र निवडणूक लढवली. परंतु अंतर्गत मतभेदानंतर शिवसेनेने राष्ट्रवादीसोबत जाण्याचा विचार केला, त्यावेळी संजय राऊत आणि शरद पवारांमध्ये भेटीगाठी वाढल्या. त्यानंतर एनसीपी आणि काँग्रेसने शिवसेनेसोबत जाण्याची तयारी केली होती.



त्यामुळे महाविकास आघाडी सरकार महाराष्ट्रात येणार, हे जवळ जवळ निश्चितच झाले होते. इतक्यात २३ नोव्हेंबरच्या बातमीने सगळ्यांनाच धक्का दिला. २३ नोव्हेंबरच्या पहाटे अजित दादांनी फडणवीसांसोबत शपथविधी पार पाडला आणि महाराष्ट्रात एनसीपी आणि भाजपाची सत्ता स्थापन करण्यात आली. त्यानंतर बहूमत सिद्ध न करु शकल्याने हे सरकार बरखास्त करण्यात आले. त्यानंतर अनेक भेटी गाठींनंतर महाविकास आघाडी सरकारने अखेर महाराष्ट्राचे सूत्र आपल्या हाती घेतले.

## राज्यात लॉकडाऊन वाढला, पुण्यातील निर्बंध होणार कमी

**पुणे (अकिल शेख)**- राज्यातील लॉकडाउन १५ जूनपर्यंत वाढविण्यात आला असला तरी पुणे शहरातील निर्बंध काही प्रमाणात शिथिल होणार आहेत. पुणे महापालिका हद्दीतील कोरोना पॉझिटिव्हिटीचा दर १०



टक्क्यांपेक्षा कमी असल्याने त्यानुसार हे निर्बंध कमी होणार आहेत. त्यानुसार शहरातील अत्यावश्यक सेवांची दुकाने आता सकाळी ७ ते दुपारी २ या वेळेपर्यंत उघडी ठेवण्याबरोबरच शहरातील आणखी काही दुकाने उघडण्यास सवलत मिळण्याची शक्यता महापालिका प्रशासकीय सूत्रांकडून व्यक्त करण्यात आली. कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी राज्यातील लॉकडाउन १५ जूनपर्यंत कायम ठेवण्याचा निर्णय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी जाहीर केला आहे. मात्र, हे करताना ज्या जिल्ह्यातील कोरोना पॉझिटिव्हिटीचा गत आठवड्यातील दर १० टक्क्यांपेक्षा कमी आणि एकूण उपलब्ध ऑक्सिजन बेड्स ४० टक्क्यांपेक्षा कमी भरले असतील त्या ठिकाणचे निर्बंध कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा फायदा पुणे शहराला मिळणार आहे.

महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, महापालिका हद्दीतील गतआठवड्यातील कोरोना पॉझिटिव्हिटीचा दर ७ टक्के आहे. तसेच शहरातील एकूण ऑक्सिजन बेडची संख्या ६ हजार ८५२ आहे, त्यामधील ३ हजार ४४० बेड २९ मेअखेरपर्यंत रिक्त आहेत.

बेड रिक्त असण्याचे हे प्रमाण जवळपास ५० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. राज्य शासनाच्या दोन्ही निकषांत महापालिका बसत असल्याने पुण्यातील निर्बंध कमी होतील. यासंबंधीची माहिती राज्य शासनाकडून मागविण्यात आली होती, ती रविवारीच देण्यात आल्याचे प्रशासकीय सूत्रांकडून स्पष्ट करण्यात आले.

## परमबीर सिंग यांच्या इशाऱ्याने वाझेकडून खंडणी वसुली, कार डिझायनर दिलीप छाबरियांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**मुंबई (विशाल पाटील)**- मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांच्या इशाऱ्यावरुनच निलंबित पोलीस निरीक्षक सचिन वाझे खंडणी वसुली करत होता, असा गंभीर आरोप कार डिझायनर दिलीप छाबरिया यांनी केला आहे. परमबीर सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन वाझे, रियाझ काझी खंडणी वसुलीचे रॅकेट चालवत असल्याचा दावाही छाबरिया यांनी केला आहे. चार महिन्यांचा तुरुंगवास भोगल्यानंतर छाबरिया सध्या जामिनावर बाहेर आहेत. 'माझ्या डीसीपीडीएल कंपनीत ५२ टक्के शेअर्स असलेल्या किरण कुमार, इंदरमल रामाणी, सीआययू युनिटच्या पोलीस अधिकाऱ्यांनी परमबीरसिंग



यांच्या इशाऱ्यावरुन माझ्याविरुद्ध खोटे गुन्हे दाखल करून खंडणी वसुली करण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप कार डिझायनर दिलीप छाबरिया यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र पाठवून केला आहे. २५ कोटी रुपयांची खंडणी द्या, अन्यथा १५ हून अधिक गुन्ह्यांना सामोरे जा, असं धमकावल्याचा दावाही छाबरियांनी केला आहे. परमबीरसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन वाझे, रियाझ काझी खंडणी वसुलीचे रॅकेट चालवत असून सीआययू युनिटच्या अंतर्गत तपास येत असलेल्या सर्व प्रकरणांची पुन्हा चौकशी करण्याची मागणी छाबरिया यांनी केली आहे. मुकेश अंबानी अँटिलिया स्फोटक प्रकरणात सचिन वाझे आणि रियाझ काझी या दोघांचं पोलिस खात्यातून निलंबन करण्यात आलं आहे. दिलीप छाब्रिया हे देशातील सुप्रसिद्ध कार डिझायनर आहेत. सेलिब्रिटी आणि धनाढ्यांच्या कार डिझाईन करण्यासाठी ते प्रसिद्ध आहेत. शाहरुख खानची व्हॅनिटी व्हॅनही दिलीप छाब्रियांनीच डिझाईन केली होती. क्रिकेटपटू दिनेश कार्तिकने दिलीप छाब्रियांविरोधात २०१५ मध्ये तक्रार नोंदवली होती. दिलीप छाब्रियांनी पाच लाख रुपये घेऊनही आपले काम योग्य पद्धतीने न केल्याचा आरोप दिनेश कार्तिकने केला होता.



संपादक:- राकेश शंकर गोरे

# फोडणीतले तेल सध्या रडवते का आहे?

**कोविड संकटाने जागतिकीकरणाच्या धोरणाला जबरदस्त तडे गेले आहेत, त्याऐवजी जगभरात आता आत्मनिर्भरता आणि स्वयंपूर्णतेच्या संकल्पाचे वारे वाहू लागले आहेत. भारतही त्याला अपवाद राहिलेला नाही. आत्मनिर्भर भारत आणि 'व्होकल फॉर लोकल'ची दिली गेलेली हाक, हा त्याचाच भाग. मात्र हा झाला संकल्प, वास्तव त्याहून वेगळे आहे आणि त्यातही खाद्यतेलाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास, या आघाडीवर भारताची स्थिती दयनीय आहे. कारण भारत हा जगातील खाद्यतेलाचा सर्वात मोठा आयातक देश बनला आहे. गतवर्षात भारताने तब्बल ८० हजार कोटी रुपयांच्या खाद्यतेलाची आयात केली. क्रुड ऑईल, सोने यानंतर आयात होणाऱ्या वस्तूंमध्ये खाद्यतेलाचा तिसरा क्रमांक लागतो. देशांतर्गत खाद्यतेलाची वार्षिक गरज २३० लाख टनांची आहे. त्यातील केवळ ८० लाख टनाचा पुरवठा देशातील तेल बियाणांच्या उत्पादनातून पूर्ण होतो.**

याचाच अर्थ ७० टक्के तेलासाठी आपण आयातीवर अवलंबून आहोत. आयातीतील १५० लाख टन तेलामध्ये ९० लाख टन खाद्यतेल हे पाम तेल आहे आणि ते प्रामुख्याने मलेशिया, इंडोनेशियाकडून पुरवले जाते. त्यातही मलेशियाचा वाटा सर्वाधिक आहे. त्यामुळे जेव्हा केव्हा रस्त्याच्या बाजूला आपण वडापाव, समोसे, डोसा, पुरीभाजी, छोले भटूरे या लोकल पदार्थांवर ताव मारत असतो, त्यावेळी हे पदार्थ परदेशातून आयात केलेल्या तेलातूनच बनलेले असण्याची शक्यता ७० टक्के असते.

भारतासारख्या शेतीप्रधान आणि त्यातही अन्नधान्यातील आत्मनिर्भर देशामध्ये खाद्यतेलाच्या बाबतीतील परावलंबित्व कधी, कसे आले? खाद्यतेलाची महागाई हा आपल्या जनमानसात चिंतनाचा आणि चिंतेचा विषय ठरत नाही. पेट्रोल व डिझेल दरवाढीकडे आपले सर्वाधिक लक्ष वेधले जाते. मात्र पेट्रोल व डिझेलपेक्षा दीडपट किंमत आपण खाद्यतेलासाठी मोजत आहोत. कोरोनामुळे आर्थिक अरिष्टात गेलेल्या गरीब, मध्यमवर्गीय व अगदी उच्च मध्यम वर्गालाही वाढत्या खाद्यतेलाच्या किमतीने अक्षरशः रडवले आहे. गेल्या एका वर्षात वनस्पती तेलाचे दर ९० रुपयांवरून १४०, सोयाबीनचे १०५ वरून १५८, पाम तेलाचे ८७ वरून १३२, तर ११० रुपये किलो असणारे मोहरीचे तेल १६३ रुपयांवर भडकले आहे. २०३० पर्यंत देशांतर्गत खाद्यतेलाची गरज ३५० लाख मेट्रिक टन एवढी प्रचंड वाढणार आहे. त्यावेळेस आयात तेलाचे प्रमाण आजच्या सरासरीएवढे गृहित धरले, तर ते २१० लाख टनावर जाण्याची शक्यता अधिक.

एकूण खाद्यतेलाच्या वापरात पाम तेलाचे प्रमाण ४० टक्क्यांवर जाऊन पोहोचले आहे. जागतिक आरोग्य संघटनेने कोविड संकटात आरोग्य हितासाठी पाम तेल



वापरू नये अशी एक सूचना जारी केली होती. त्यावर मलेशिया सरकारने आगपाखड केली. जैवविविधता असलेले जंगल पेटवून देऊन त्याजागी मलेशिया व इंडोनेशियात होणारी पामची शेती युरोप आणि अमेरिकेला मान्य नाही. त्यातूनच पाम तेलावर निर्बंध लावण्याचे निर्णय युरोपात घेतले गेले. पाम तेलाच्या वापरावरून आंतरराष्ट्रीय राजकारण पेटले आहे.

खाद्यतेलाच्या या संकटातून भारताला बाहेर काढण्याची ताकद देशातील शेतकऱ्यांमध्ये नक्कीच आहे. ज्या शेतकऱ्यांनी गहू आणि तांदळाची गोदामे भरून काढली, तेच शेतकरी तेलबियांच्या उत्पादनातही देशाला आत्मनिर्भर करतील. मात्र तेल आयातीवर ८० हजार कोटी रुपयांचे चलन खर्च करण्यापेक्षा त्यातील दहा-वीस टक्के भाग तरी देशाने शेतकऱ्यांवर खर्च करायला हवा.

सरकारने खाद्यतेलाच्या आयातीवरील शुल्क ५० टक्के वाढवले आहे. २०३० पर्यंत देशाला खाद्यतेलात आत्मनिर्भर करण्याचे उद्दिष्टही सरकारने निश्चित केले. तेलबियांच्या उत्पादन वाढीसाठी राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत पुढील पाच वर्षात १९ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात खाद्यतेलाचा निर्यातदार असलेला भारत पुन्हा इतिहासाची पुनरावृत्ती करू शकतो. सरकारच्या इच्छाशक्तीची त्यासाठी आवश्यकता आहे. मात्र त्याचबरोबरीने खाण्याच्या सवयीही आपल्याला प्रयत्नपूर्वक बदलाव्या लागतील. कारण १९९२-९३ मध्ये भारतात प्रति व्यक्ती खाद्यतेलाचा वापर वर्षाला ६ किलो होता, तो आता तब्बल १९ किलोपर्यंत गेलाय. जागतिक आरोग्य संघटनेने प्रति व्यक्ती वर्षाला केवळ १० किलो तेलाचाच उपभोग घेण्याची सूचना (इशारा) केलेली आहे, हेही आपण ध्यानी ठेवावे, हे बरे!

## महामार्गापेक्षा अंतर्गत मार्ग धोक्याचे

**ठाणे (तृप्ती गोरे)-** भरधाव तसेच अवजड वाहनांची वाहतूक यांमुळे महामार्गावर होणाऱ्या अपघातांत बळींचे प्रमाण अधिक असल्याच्या नोंदी असतात. ठाणे वाहतूक पोलिसांनी नुकत्याच केलेल्या एका सर्वेक्षणात मात्र अंतर्गत मार्गही वाहनचालकांसाठी धोकादायक ठरत असल्याचे स्पष्ट झाले आहे. ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी शहरात वर्षभरात झालेल्या ६६८ अपघातांपैकी ४२८ अपघात हे अंतर्गत मार्गावर झाले आहेत. यामध्ये १०८ जणांना जीव गमवावा लागला आहे. डोंबिवली, अंबरनाथ, कल्याण, भिवंडी येथील अपघातांचे प्रमाणही अधिक आहे. ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी ही शहरे येतात. या शहरांतून मुंबई-नाशिक आणि मुंबई-आग्रा हे राष्ट्रीय महामार्ग जातात. घोडबंदर, शिळफाटा हे महत्त्वाचे राज्य महामार्ग आहेत. शहरातील वाहतुकीसाठी आणि महामार्गांना जोडण्यासाठी विविध अंतर्गत मार्ग आहेत. या मार्गावरून दररोज हजारो जड-अवजड तसेच हलक्या वाहनांची ये-जा सुरू असते. काही दिवसांपूर्वीच ठाणे वाहतूक पोलिसांनी या शहरांतून जाणाऱ्या राष्ट्रीय, राज्य महामार्ग आणि इतर अंतर्गत रस्त्यांवर होणाऱ्या अपघातांचे सर्वेक्षण केले. २०२० मध्ये झालेल्या ६६८ अपघातांच्या या सर्वेक्षणात सर्वाधिक ४२८ अपघात हे अंतर्गत मार्गावर झाल्याचे आढळून आले. त्यामध्ये १०८ जणांचा मृत्यू झाला आहे. २४७ जण गंभीर जखमी झाले. तर, १४५ जणांना किरकोळ दुखापत



झाली. या व्यतिरिक्त राष्ट्रीय महामार्गावर १९४ अपघात झाले. त्यामध्ये ७१ जणांचा मृत्यू झाला. ९७ जण गंभीर आणि ७५ जण किरकोळ जखमी झाले. राज्य महामार्गावर ४६ अपघात झाले असून १३ जणांचा मृत्यू आणि ३४ जण गंभीर जखमी झाले. १४ जणांची नोंद किरकोळ जखमींमध्ये करण्यात आली आहे. अंतर्गत मार्गावर भरधाव वाहने चालविणे, काही अंतर्गत मार्गावर जड-अवजड वाहनांची वाहतूक तसेच रस्ते खराब असणे यामुळे हे अपघात वाढले असल्याचे वाहतूक शाखेतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

# दोन वर्षांत आरोग्यासेवांवर २५८ कोटींचा खर्च

**नवी मुंबई (आकाश कांबळे)-** करोना संकटामुळे नवी मुंबई महापालिकेच्या या वर्षीच्या वार्षिक खर्चात ४७५ कोटींची वाढ होत तो २३०८ कोटींवर पोहचला आहे. तर यापैकी १९३ कोटी १४ लाख फक्त आरोग्य सुविधांवर खर्च करण्यात आले आहेत. तर गेल्या वर्षी आरोग्यासाठी ६५ कोटी असा दोन वर्षांत २५८ कोटींचा खर्च झाला आहे. करोना संकटामुळे राज्यासह स्थानिक स्वराज्य संस्थांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. इतर सर्व विकासकामे ठप्प झाली आहेत. कमी उत्पन्न असलेल्या महापालिकांपुढे तर पुढील काळात आरोग्य सुविधा कशा पुरवायच्या हा मोठा प्रश्न उभा राहिला आहे. नवी मुंबई महापालिका ही त्या तुलनेत आर्थिकदृष्ट्या सक्षम महापालिका असल्याने प्रशासन गेली दोन वर्षे उत्पन्नाच्या जीवावर या संकटाला तोंड देत आहे. गेल्या वर्षी करोनाच्या पहिल्या लाटेत पालिकेने आरोग्यावर ६५ कोटी इतका खर्च केला होता. यात दुसऱ्या लाटेत मोठी वाढ झाली असून तो १९३



कोटींवर गेला आहे. त्यामुळे पालिकेच्या वार्षिक खर्चातही वाढ झाली आहे. सन २०१९-२० मध्ये एकूण १८३३ कोटी असलेला वार्षिक खर्च सन २०२०-२१ मध्ये २३०८ कोटींवर गेला आहे. शहरात १५ मार्च २०२० रोजी करोनाचा पहिला रुग्ण सापडला होता. त्यानंतर एप्रिलमध्ये संसर्ग अधिक पसरला. त्यामुळे पालिका प्रशासनाने इतर खर्च वगळून आरोग्य सुविधांवर लक्ष केंद्रित केले होते. त्यामुळे मागील वर्षी मार्च व एप्रिल या दोन महिन्यातच ११ कोटींचा खर्च केला होता, तर वर्षभरात ६५ कोटींवर खर्च गेला होता. करोनाची दुसरी लाट ही यावर्षी एप्रिलपासून सुरू होत शहरात प्रचंड वेगाने संसर्ग पसरला. महिनाभरात शहरात पहिल्या लाटेत निर्माण केलेल्या आरोग्य सुविधाही कमी पडल्या. त्यामुळे प्रशासनाला आरोग्य सुविधा मोठ्या प्रमाणात निर्माण कराव्या लागल्या. तसेच या लाटेत प्राणवायूचीही मोठी गरज भासली. त्यात करोना लसीकरण जानेवारीपासून सुरू झाल्याने यासाठी खर्च वाढत गेला. यावर्षी मार्च व एप्रिल या दोन महिन्यात ४९ कोटी ५० लाख इतका खर्च झाला असून वर्षभरात तो १९३ कोटी १४ लाखांवर गेला आहे.

# बांधकाम क्षेत्राला सिडकोचा दिलासा

**नवी मुंबई (धनश्री सट्टा)-** करोनाच्या प्रादुर्भावामुळे गेल्या वर्षभरापासून बांधकाम क्षेत्रात आलेल्या मंदीला संजीवनी देण्याच्या दृष्टीने सिडकोने नवी मुंबईतील विविध नोड आणि आसपासच्या परिसरातील जमिनींची राखीव किंमत न वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. सिडको दरवर्षी मार्चमध्ये या किमतीत पाच ते १५ टक्के वाढ करते. मात्र, गेल्या वर्षांपासून सिडकोने हे दर कायम ठेवले आहेत. त्यामुळे बांधकाम क्षेत्राला मोठा दिलासा मिळणार आहे.

नवी मुंबई, पनवेल, उरण या सिडको क्षेत्राची मालकी राज्य शासनाच्या वतीने सिडकोची आहे. त्यामुळे येथील सर्व जमीन भूखंड यांचे एक बाजारमूल्य ठरविले जाते. या बाजारमूल्याच्यावर ग्राहक ती जमीन किंवा भूखंड विकत घेऊ शकतो. मात्र गेले वर्षभर सिडकोने या राखीव बाजारमूल्यामध्ये वाढ केलेली नाही. करोना साथ सुरू झाल्यापासून बांधकाम क्षेत्राला



मंदी आली असून अनेक मजूर कामगार काम सोडून त्यांच्या गावी गेले आहेत. याशिवाय अनेक घरे, गाळे विक्रीविना पडून आहेत. बांधकाम क्षेत्राला चालना मिळावी यासाठी सिडको संचालक मंडळाने आणखी वर्षभर जमिनीची राखीव किंमत न वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे ग्राहकांना सिडकोची मालमत्ता विकत घेताना जादा बाजार मूल्याचा भरुदड पडणार नाही. अविकसित जमिनीची किंमत, पायाभूत सुविधांची निर्मिती, उपखर्च, व्याज, नोड विकसित करण्यासाठी येणारा खर्च, भविष्यातील खर्चाचा आढावा विचारात घेऊन सिडकोचा अर्थशास्त्र विभाग हे बाजारमूल्य ठरवत असून ते प्रत्येक क्षेत्रागणिक वेगळे असल्याचे दिसून येते. करोना साथीच्या अनुषंगाने लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटांचा विचार करून सिडकोने नवी मुंबई व जवळपासच्या जमिनींच्या राखीव किमती गोठविण्याचा निर्णय घेतला आहे.

## नेहमीच्या वादातून दोन सुरक्षा रक्षकांनी केली १९ वर्षीय तरुणाची हत्या

**मीरारोड (दिगंबर जाधव) -** मीरारोडमधील एका इमारतीत राहणारा १९ वर्षीय तरुण आणि इमारतीचे सुरक्षा रक्षक यांच्यातील किरकोळ वादातून झालेल्या भांडणात सुरक्षा रक्षकांनी तरुणाची चाकू भोसकून हत्या केल्याच्या घटनेने खळबळ उडाली



आहे. दोघेही आरोपी फरार झाले असून काशीमीरा पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. मीरारोडच्या सृष्टी सेक्टर १ मध्ये हंस इमारती जवळ शुक्रवारच्या मध्यरात्री नंतर शनिवारच्या मध्यरात्री १२ . ३० च्या सुमारास हि घटना घडली. येथे कुंभ इमारतीत राहणारा अभिषेक सिंग हा १९ वर्षांचा तरुण मध्यरात्री बाहेरून गृहसंकुलात आला.

## शहरी भागात म्युकरमायकोसिसच्या रुग्णांत वाढ

**ठाणे (शकिल शेख)-** जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून करोनाचा संसर्ग कमी होऊ लागला असला तरी म्युकरमायकोसिस या बुरशीजन्य आजाराने डोके



वर काढले आहे. जिल्ह्यातील वेगवेगळ्या शहरांमध्ये दररोज सरासरी दहापेक्षा अधिक रुग्ण या आजाराने ग्रस्त असल्याचे आढळून आले आहे. दुसऱ्या लाटेनंतर आतापर्यंत या आजाराने ग्रस्त असलेले ११७ रुग्ण आढळले असून त्यापैकी दहा जणांचा मृत्यू झाला आहे. हे सर्व रुग्ण महापालिका क्षेत्रात सापडले असून ग्रामीण भागात एकही रुग्ण आढळून आलेला नाही. करोनातून बरे झालेल्या रुग्णांना म्युकरमायकोसिस या बुरशीजन्य आजाराची लागण होत आहे. मधुमेह, कर्करोग रुग्ण तसेच रोग प्रतिकारशक्ती कमी असलेल्या व्यक्तींना या आजाराची लागण होण्याची शक्यता अधिक असते. या रुग्णांना वेळीच उपचार मिळाले नाही तर डोळ्यांवाटे हा संसर्ग मेंदूमध्ये जाऊन रुग्ण दगावण्याचीही शक्यता असते. त्यामुळे अशा रुग्णांना तात्काळ उपचार मिळावेत यासाठी जिल्हा तसेच महापालिका यंत्रणांनी प्रयत्न सुरू केले आहेत.

# तलावांच्या गाळात विसर्जित मूर्तींचे अवशेष

**नवी मुंबई (सतिश सोनावणे)-** गणेशमूर्ती बाबत शासनाने अद्याप धोरण जाहीर केले नाही. मात्र गेल्या वर्षी विसर्जन करण्यात आलेल्या प्लास्टर ऑफ पॅरिसच्या



गणेशमूर्तीचे अवशेष शहरांतील विसर्जन तलावांत अस्ताव्यस्त पडलेले दिसत आहेत. वाशीतील तलावातील पाणी आटल्याने हे चित्र पाहून पर्यावरणप्रेमींनी आता तरी जागे व्हा! या वर्षी पर्यावरणपूरकच गणेशमूर्ती घ्या, असे आवाहन केले आहे. पर्यावरणप्रेमींकडून मागणी होत असल्याने गेल्या वर्षी केंद्राने प्लास्टर ऑफ पॅरिसपासून मूर्ती बनवण्यासाठी बंदी घालण्यात आली होती. मात्र त्यानंतर एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आल्याने गेल्या वर्षी प्लास्टर ऑफ पॅरिसपासून बनविलेल्या मूर्ती मूर्तिकारांनी बाजारात विक्रीसाठी ठेवल्या होत्या. या मूर्त्यांचे जेव्हा विसर्जन होते त्या वेळी पाण्यात प्लास्टर ऑफ पॅरिसचे विघटन होत नसल्याने या मूर्त्या अस्ताव्यस्त पडलेल्या असतात.

### राज ठाकरेंचा एक कॉल अन् प्रॉब्लेम सॉल्व्ह; 'त्या' वृद्ध शिक्षिकेला अवघ्या काही तासांत मदत

**वसई (प्रतिनिधी):** तौत्के चक्रीवादळचा पश्चिम किनारपट्टीला जोरदार तडाखा बसला. यात समुद्र किनाऱ्याजवळ मोठ्या प्रमाणात नुकसान झालं. वसई येथील एका वृद्धाश्रमालाही वादळाचा फटका बसला. न्यू लाइफ फाऊंडेशनच्या वृद्धाश्रमाचं चक्रीवादळानं मोठं नुकसान झालं. याच वृद्धाश्रमात राहत असलेल्या सुमन लक्ष्मीकांत रणदिवे यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंकडे मदतीसाठी साद घेतली.

# ठाणे जिल्ह्यात पालिकांची धावपळ

**ठाणे (आकाश कांबळे)-** जिल्ह्यात चार हजारांहून अधिक करोनाबाधित रुग्ण गृहअलगीकरणात उपचार घेत आहेत. राज्य शासनाच्या नव्या निर्देशानुसार या रुग्णांना करोना काळजी केंद्रात दाखल करावे लागणार असल्याने जिल्हा आणि महापालिका प्रशासनाची धावपळ सुरू झाली आहे. शहरी तसेच ग्रामीण भागात यापूर्वी उभारण्यात आलेल्या करोना काळजी केंद्रात पुरेशी जागा उपलब्ध आहे, असा दावा जरी प्रशासनामार्फत केला जात असला तरी इतक्या मोठ्या प्रमाणावर रुग्णांची देखभाल तसेच त्यांना इतर सुविधा पुरविताना यंत्रणांवरील भार आणखी वाढणार आहे.



पहिल्या लाटेत करोनाची साखळी तोडण्यासाठी करोनाबाधित रुग्णांसह त्यांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींना करोना केंद्रात ठेवले जात होते. काही महिन्यांनंतर केंद्र शासनाने नियमावलीत बदल करत सौम्य लक्षणे असलेल्या रुग्णांना गृहअलगीकरणात राहण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला. दुसऱ्या लाटेत अनेकांनी हा पर्याय निवडत घरीच उपचार घेण्यावर भर दिला. अशा रुग्णांची संख्या मोठी होती. सद्य:स्थितीत जिल्ह्यात १० हजार ९५३ उपचाराधीन रुग्ण आहेत. त्यापैकी ४ हजार २८ रुग्ण गृहअलगीकरणात आहेत. राज्य शासनाच्या नव्या निर्देशामुळे या रुग्णांना आता करोना केंद्रात दाखल व्हावे लागणार आहे. ठाण्यासह १८ जिल्ह्यांतील करोनाबाधितांचे प्रमाण राज्याच्या सरासरीपेक्षा अधिक असल्याने या सर्व जिल्ह्यांतील अलगीकरण बंद करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यामुळे गृहअलगीकरणातील रुग्णांना करोना केंद्रात दाखल व्हावे लागणार आहे. ठाणे महापालिका क्षेत्रातील करोना केंद्रामध्ये ८९५ रुग्ण ठेवण्याची क्षमता असून त्या ठिकाणी १३७ रुग्ण उपचार घेत आहेत. तसेच ३६२ रुग्ण गृहअलगीकरणात उपचार घेत आहेत.

गेल्या काही दिवसांपासून रुग्णसंख्या कमी होऊ लागली आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत उपलब्ध असलेली करोना केंद्रे पुरेशी आहेत. रुग्णसंख्या वाढली तर, आणखी कुठे करोना केंद्र उभारता येऊ शकतात का, याचेही नियोजन करण्यात येत आहे, अशी माहिती ठाणे महापालिका उपायुक्त संदीप माळवी यांनी दिली.


## जाहिर नोटीस
### वसई-विरार शहर महानगरपालिका
**प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम), मुख्य कार्यालय विरार दूरध्वनी क्र. १२२५०-२४०२१७९/२४०२५६३**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ.क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरिदाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | निळेमोरे-६ | NL२९/५/३ | ३०५५ | शारदास सुंदरम अय्यर | बालसुब्रमनियम सुंदरम अय्यर |
| २ | निळेमोरे-६ | NL२९/१५५/३५७ | ५६१९ | संजय बॅनर्जी | आनंद त्रिभुवन उपाध्याय |
| ३ | निळेमोरे-६ | NL२९/२७/१२ | ५३३० | पचांल चेतन गणपतलाल | स्नेहा राजेश दुबे |
| ४ | निळेमोरे-६ | NL२९/१५०/५२ | ५५२१ | ललित गणेश राठोड व सुनिता ललित राठोड | मुईवा वरहनला व अर्जुन कन्वर |
| ५ | निळेमोरे-६ | NL२९/१४१/२३ | ४४४३ | जयसिंग अमरसिंग राजपुरोहित | रेखा रॉबर्ट डिब्रिटो |
| ६ | निळेमोरे-५ | NL२८/८८/६५ | १२२३१ | सिताराम डेव्हलपर्स | रंजित सिताराम चौरासिया व संदीप चौरसिया |
| ७ | निळेमोरे-६ | NL२९/१५१/३९ | ७८३२ | भव्य निर्माण बिल्डर्स एन्ड डेव्हलपर्स | रफिक मोहम्मद अब्दुल मन्नाज शेख |
| ८ | निळेमोरे-६ | NL२९/१४४/६९ | ११६७७ | अशोकसिंग बी. राजपुरोहित | हार्दिक कामदार अभी कामदार |
| ९ | निळेमोरे-६ | NL२९/११४/६ | १०८५४ | अब्दुल अहमद शेख | हसमुख लालजी छेडा |
| १० | निळेमोरे-५ | NL२८/५०/८ | १२३२४ | नारायण नाथु खारपा | सबा खान |
| ११ | निळेमोरे-७ | NL३०/३३५/६ | १२३२० | छाया उल्हास रंभिया | प्रितेश तुकारम पवार व सुनिता तुकाराम पवार |
| १२ | निळेमोरे-५ | NL२८/१०४/६९ | ११७४३ | प्रीती हर्षद ठक्कर व हर्षद वसंतजी ठक्कर | राकेश रामचंद्र नायर व मेरी बी गुप्ता बत्तुलल्ला |
| १३ | निळेमोरे-६ | NL२९/१५४/१२ | १२२५९ | गॅलक्सी कंन्स्ट्रक्शन | मोसादिर आलम अबुसादी आलम व आरसी सुरैया मो. सादिर आलम |
| १४ | निळेमोरे-६ | NL२९/३६/६० | ७३५० | पुष्पा अनंत कुमार मौर्या | फिरदौश अफरोज अली शेख व अफरोज अली शेख |
| १५ | निळेमोरे-५ | NL२८/१०२/३८ | ११९३० | रवी ओम गुप्ता | लीला संतु जयस्वाल व रत्ना अनुप वर्मा |
| १६ | निळेमोरे-७ | NL३०/३३५/२७ | १२३१९ | छाया उल्हास रांभिया | राजेश कुमार अयोध्याप्रसाद वर्मा व अनिता राजेश कुमार वर्मा |
| १७ | निळेमोरे-७ | NL३०/१६०/६ | १२१५४ | अमेय ओमकार कराळे | कमलादेवी कानाराम चौधरी |
| १८ | निळेमोरे-७ | NL३०/३८२/३२ | १२२९६ | आर. जी. डेव्हलपर्स | प्रेमनाथ पारसनाथ योगी |
| १९ | निळेमोरे-५ | NL२८/९३/१७ | ४८७६ | सप्तर्षी डेव्हलपर्स | वैजयंती महेंद्र तन्ना व महेंद्र गोकुळदास तन्ना |
| २० | निळेमोरे-५ | NL२८/८४/१३ | ४८४० | विभुती एन. शहा | लिला नाझरेथ लोपीस |

जा. क्र. व.वि.श.म./क.वि/२८१/२०२१-२२
दिनांक : ३१/०५/२०२१

सही/-
**(धनश्री शिंदे)** सहा. आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प.)
वसई-विरार शहर महानगरपालिका


Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press gala no 3/4, amin Ind. estate, Sonawala Cross Road no 2, Goregaon (East), Mumbai-400063, Maharashtra and Published at Vishnu Sadan society, Ramchandra Sukhai chawl no 1, Room no 4, Jai hind nagar, Khar (East), Dist- Mumbai-400051, Maharashtra. **Editor: Rakesh Shankar Gore**
R.N.I. No. MAHMAR/2010/33301. Off. No.: 022-2651 5151 Mob. 9809386748 / 9803386748, **website:** maharashatracrimetimes.com, **Email:** Info@maharashtracrimetimes.com **Legal Advisor: D. K. Pandey (B.A.L.L.B.) (High Court Mumbai)**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)

# मुंबई इन मिनिट्स' स्वप्न प्रत्यक्षात येणार: मेट्रोच्या जाळ्यामुळे प्रवास सुपरफास्ट होणार



**मुंबई (योगेश होळंब):** पश्चिम उपनगरात येत्या ऑक्टोबरमध्ये मेट्रो २अ आणि मेट्रो ७ सुरू होणार आहे. सध्या दोन मेट्रोमध्ये अर्धा तासाचे अंतर असेल. मेट्रोची संख्या वाढवितानाच दोन मेट्रोमधील वेळेचे अंतर कमी करण्यासाठी विचार केला जाणार आहे. मेट्रो सुरू झाल्यानंतर त्याचे जाळे विस्तारणार आहे. साहजिकच मुंबईची कनेक्टीव्हिटी आणखी वाढेल. उपनगर जवळ येईल. यामुळे प्रवास सुखकर होतानाच 'मुंबई इन मिनिट्स' हे स्वप्न प्रत्यक्षात साकार होईल, असा विश्वास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त आर. ए. राजीव यांनी व्यक्त केला आहे.

ऑक्टोबर २०१५ साली कामाला मंजुरी मिळाल्यानंतर ११ ऑक्टोबर २०१५ साली प्रकल्पाचे भूमिपूजन झाले. मे २०१६ साली प्रत्यक्षात कामास सुरुवात झाली. २०२० साली चारकोप डेपो तयार झाला. दोन्ही मेट्रोची एकूण लांबी ३५.१ किमी आहे. मेट्रो २ अ मार्ग १८.६० किमी तर मेट्रो ७ हा मार्ग १६.५ किमी लांब आहे. कोरोनामुळे दीड वर्षांपासून कामाला फटका बसला. तरीही काम सुरू ठेवत वेगाने पूर्ण केले. मेट्रो-२ अ मार्गावर दहीसरपासून कामराज नगर २० कि.मी. लांबीच्या मेट्रो मार्गावर चार महिने चाचणी घेतली जाईल. तांत्रिक बाजूही तपासल्या जातील. रेल्वे सुरक्षा आयुक्तालयाने ना हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर येत्या ऑक्टोबरमध्ये मेट्रो प्रवाशांच्या सेवेत दाखल होईल.

मेट्रो प्रकल्पांसाठी सुमारे १२ हजार कोटींची गुंतवणूक झाली आहे. आतापर्यंत ६ हजार कोटी खर्च झाले. कोरोनासह इतर घटकांचा परिणाम झाल्याने प्रकल्पास विलंब झाला असला तरी खर्च वाढणार नाही. २०२० आणि २०२१मध्ये कामात अनेक अडथळे आल्याने मार्चमध्ये होणारी चाचणी आता मे महिन्याच्या शेवटी होत आहे. मुंबई विमानातळावरील टर्मिनल एक आणि दोनसाठीच्या आवश्यक भूमिगत मार्गांचे कामही प्राधिकरण करेल. याचा भूमिपूजन सोहळा सोमवारी आहे.

## मुंबई वीज पारेषण प्रकल्पांसाठी कृती गट नेमावा

**मुंबई (राकेश गायकवाड):** मुंबई व परिसरात ऑक्टोबर २०२० मध्ये झालेल्या विद्युत यंत्रणेतील बिघाडाबाबत नेमण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीने राज्य वीज नियामक आयोगाला अहवाल दिला असून मुंबई महानगर प्रदेशातील वीज पारेषण प्रकल्पांच्या वेगवान अंमलबजावणीसाठी आणि विविध यंत्रणांमधील समन्वयासाठी कृती गट नेमण्याचा आदेश वीज नियामक आयोगाने शुक्रवारी राज्याच्या ऊर्जा विभागाला दिला. मुंबई व परिसरात ऑक्टोबर २०२० मध्ये झालेल्या विद्युत यंत्रणेतील बिघाडामुळे मुंबईतील वीजपुरवठा कित्येक तास ठप्प झाला होता. शिवाय आसपासच्या अनेक भागांत वीजपुरवठा बंद झाला होता. या घटनेची दखल घेऊन



उच्च स्तरीय समिती नेमण्यात आली होती. या उच्चस्तरीय समितीने राज्य वीज नियामक आयोगाला अहवाल दिल्यानंतर त्याअनुषंगाने वीज आयोगाने शुक्रवारी आदेश दिला. खारघर-विक्रोळी, कु डुस-आरे या उच्चदाब पारेषण प्रकल्पांसह इतर संबंधित प्रकल्पांच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी व संबंधित कामे करणारी वीज कं पनी, महापारेषण, राज्य भार प्रेषण केंद्र अशा सर्व यंत्रणांशी समन्वय ठेवण्यासाठी व अडचणी दूर करण्यासाठी २०१२ च्या धर्तीवर ऊर्जा विभागाने कृती गट नेमावा, असा आदेश वीज आयोगाने दिला आहे. त्याचबरोबर प्रकल्पांची दैनंदिन कामांवर देखरेख ठेवण्यासाठी व त्याबाबतच्या इतर गोष्टींसाठी वीज आयोग एक देखरेख समितीही स्थापन करणार आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांच्या वारसाला नोकरी

**मुंबई (अलीहूसेन शेख):** करोनामुळे मृत पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकं पातत्त्वावर नोकरी देण्याचा निर्णय झालेला असतानाही त्याची अंमलबजावणी होत नव्हती. परिणामी वारसांकडून नोकरीसाठी एसटीकडे हेलपाटे मारावे लागत होते. यामुळे महामंडळावर बरीच टीका झाल्यानंतर वारसांना अनुकं पातत्त्वावर नोकरी देण्यासंदर्भात शनिवारी परिपत्रक जारी के ले.



परिपत्रकानुसार, सेवेत असताना अन्य कारणांमुळे किंवा करोनामुळे कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास त्या कर्मचाऱ्यांच्या एका वारसाला नोकरी देण्यात येईल, असे स्पष्ट के ले आहे. रिक्त जागेची उपलब्धता पाहता महामंडळाने याबाबत निर्णय घेतला व त्याचे अनुपालन करावे, अशा सूचना राज्यातील एसटीचे सर्व विभाग नियंत्रक, कार्यशाळा व्यवस्थापक यांना दिल्या आहेत. एसटीतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सेवेत असताना करोना किं वा अन्य कारणांमुळे जरी कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या वारसाला अनुकं पातत्त्वावर नोकरी दिली जाईलच. हे आधीही स्पष्ट के ले होते. रिक्त जागा पाहता आता त्याची अंमलबजावणी करण्यासाठी परिपत्रक जारी के ल्याचे सांगितले. दरम्यान, आतापर्यंत करोनामुळे एसटीतील एकू ण ८ हजार ५८७ कर्मचारी करोनाबाधित झाले असून २६५ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. तर ६७८ कर्मचाऱ्यांवर उपचार सुरू आहेत.

## पार्किंग समस्या सोडवण्यासाठी BMC चं एक पाऊल पुढे; वाहनतळ प्राधिकरण स्थापन करण्यास मान्यता

**मुंबई (प्रतिनिधी)-** महानगरपालिका क्षेत्रासाठीचा विकास आराखडा -२०३४' आणि संबंधित 'विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४' नुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वाहनतळ व्यवस्थापन विषयक बाबींसाठी वाहनतळ प्राधिकरणाची निर्मिती करण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार वाहनतळ प्राधिकरण निर्मितीच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही सुरू करण्यास व त्यासाठी बाह्य सेवा पुरवठादार यांची व तज्ज्ञ मंडळींची नेमणूक करण्यास स्थायी समितीचे अध्यक्ष यशवंत जाधव यांच्या अध्यक्षतेत झालेल्या स्थायी समिती बैठकीदरम्यान नुकतीच मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. या मंजुरी नुसार भारतीय प्रशासकीय सेवेतील निवृत्त सनदी अधिकारी रामनाथ झा यांची सदर कार्यवाहीसाठी मार्गदर्शक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचबरोबर 'टाटा सामाजिक विज्ञान संस्थान' यांची बाह्य सेवा पुरवठादार म्हणून नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्यामार्फत संबंधित विषयातील तज्ज्ञ मंडळींच्या सेवा उपलब्ध करून घेण्यात येणार आहेत, अशी माहिती नवनियुक्त वाहनतळ आयुक्त तथा अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) पी. वेलरासू यांनी दिली आहे.

मुंबई शहरामध्ये दिवसेंदिवस वाहनतळाची समस्या बिकट होत चालली आहे. या समस्येचे निराकरण करण्याकरिता सार्वजनिक ठिकाणी सोयीची, सुरक्षित व परवडण्यासारखे वाहनतळ योग्य प्रकारे व विनिमयांसह



उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे.

वरील अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राचा विकास आराखडा आणि 'विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४' मध्ये महानगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रातील सर्व रस्त्यांवरील व रस्त्यालगतच्या वाहनतळांचे व्यवस्थापन, नियोजन आणि नियंत्रण करण्याकरिता महापालिका स्तरावर वाहनतळ प्राधिकरणाचे गठन करावे; अशी शिफारस यापूर्वीच करण्यात आली आहे.

## करोना काळात शिक्षणात खंड, बालमजूर वाढले

**मुंबई (जसबीरकौर भामरा):** करोनामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा फटका अल्पवयीन मुलांनाही बसला आहे. कुटुंबातील कमावत्या व्यक्तीचा रोजगार बुडाल्याने आणि वर्षभरापासून शाळा बंद असल्याने अनेकजण बालमजुरीकडे ढकलली गेली आहेत. गेल्या वर्षभरात वीट भट्टी, ऊस तोडणी, घरकाम अशा ठिकाणी शालेय शिक्षण घेणारी मुले काम करताना आढळू लागल्याचे सामाजिक संस्थांच्या पाहणीत समोर आले आहे. मात्र कामगार विभागाच्या दरबारी एप्रिल २०२० ते मार्च २०२१ या काळात केवळ ५५ बालकामगारांची नोंद झाली आहे. आश्रम शाळा, वसतिगृहात राहून शिकणारी मुले सध्या घरीच आहेत. दुर्गम भागात आणि ऑनलाइन शिक्षणासाठी मोबाइल फोन तसेच इंटरनेट सुविधेअभावी मुले शिक्षणाच्या प्रवाहापासून तुटली आहेत. त्यातच कु टुंबीयांना आर्थिक मदत करण्यासाठी मुले बालमजुरीकडे ढकलली जात आहेत. 'विनीत (नाव बदलून) हा नववी इयत्तेत शिकणारा मुलगा टाळेबंदीमध्ये वीटभट्टी कामगार झाला. त्याचे वडील वीटभट्टीवर, तर आई मोलमजुरीचे काम करते. टाळेबंदीत दोघांचे काम सुटले. ऑनलाइन शिक्षणाची सोय नसल्यामुळे विनीत शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडला होता. त्यामुळे पुन्हा काम सुरू होताच कु टुंबीयांना आर्थिक मदतीसाठी विनीतही वीटभट्टीवर कामाला जाऊ



लागला,' अशी माहिती वंचित विकास संस्था खंडाळाचे सचिव राजेंद्र काळे यांनी दिली. 'सध्या शाळा बंद आहेत. त्यामुळे अनेक मुले गाड्या धुणे, कचरा गोळा करायला, भंगार गोळा करायला जाताना दिसत आहेत. गेल्या वर्षभरात हे प्रमाण वाढल्याचे दिसत आहे,' असे बालहक्क कृती समिती पुणेचे मंदार शिंदे यांनी सांगितले.सरकारच्या बालकामगारांच्या व्याख्येनुसार १४ आतील मुले ही बालकामगार म्हणून गणली जातात. तर १४ ते १८ वयोगटातील आणि धोकादायक उद्योग व्यवसायात काम करणारी मुले बालकामगार समजली जातात. मात्र कारोनाकाळात अनेक १४ ते १८ वयोगटातील मुले मजुरीकडे वळली आहेत. 'मुंबईत वांद्रे परिसरात शिक्षण घेणारी १० वर्षीय मुलगी तीन चार घरात घरकाम करू लागली आहे. या मुलीच्या आईचा रोजगार बुडाला आहे. या दोघी मायलेकी घरकाम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवू लागल्या आहेत,' असे क्राय संस्थेशी संलग्न असलेल्या हॅबिटाट अँड लाईवलीहूड वेल्फे अर असोसिएशनच्या प्रमुख श्वोता दामले यांनी सांगितले. संकल्प मानव विकास संस्था परभणीने केलेल्या पाहणीत ऊस तोडणी, वीटभट्टी, शेतात आणि घरकामाला बाल मजुरांचे प्रमाण वाढल्याचे आढळून आले. संस्थेला जालना जिल्ह्यात १४ वर्षांखालील ७४२ बालमजूर आढळून आले.

## मान्सूनच्या तोंडावर चक्रीवादळ येणार; चक्रीवादळ रोधक यंत्रणा उभारण्यासाठी अभ्यास सुरू

**मुंबई (विशाल पाटील):** मान्सूनच्या तोंडावर चक्रीवादळ येणार हे गृहीत धरून तसेच चक्रीवादळात वीजपुरवठा खंडित होऊ नये म्हणून चक्रीवादळरोधक वीज पायाभूत सुविधा कशा उभारता येतील, याचा अभ्यास सुरू करण्यात आला आहे. चक्रीवादळाचा मुकाबला करण्यासाठी महावितरण, महापारेषण यांच्यासह मुंबईतील बेस्ट, अदानी, टाटा यांच्यासारख्या संस्थांचे प्रतिनिधी यांचा समावेश असलेला एक कोअर गट स्थापन करण्यात आला आहे. याशिवाय २४ तास सक्रिय असलेला एक नियंत्रण कक्षही महावितरणच्या मुख्यालयात स्थापन करण्यात आला आहे. जागतिक वातावरणात होणारे बदल लक्षात घेता दरवर्षी मान्सूनच्या तोंडावर चक्रीवादळ येणार, हे गृहीत धरून नियोजन करा. वादळामुळे कमी नुकसान होईल. वीजपुरवठा तत्काळ पूर्ववत करता येईल, यासाठी कायमस्वरूपी नियोजन, आदर्श कार्यप्रणाली तयार करा, दरवर्षी पाऊस आल्यावर अनेक ठिकाणी वीज जाते. हे टाळण्यासाठी पावसाळी पूर्वतयारीचा भाग म्हणून पाऊस झाल्यावरही वीजपुरवठा कायम राहावा, यासाठी आपत्कालीन योजना तयार करा, असे निर्देश देण्यात आले आहेत. एखाद्या ठिकाणी वीज गेल्यास तिथे वीजपुरवठा करण्याचे अन्य पर्याय काय असतील, याचाही आराखडा तयार करा, अशा सूचनाही करण्यात आल्या आहेत. ९९.९६ टक्के भागात वीज सुरळीत तौक्ते चक्रीवादळाने सिंधुदुर्ग, रत्नागिरी,



पालघर, रायगड, पुणे व कोल्हापूर जिल्ह्यांमधील वीज यंत्रणेला तडाखा दिला. २०१ उपकेंद्र, १३४२ उच्चदाब वीजवाहिन्या व ३६ हजार ३० रोहित्रांचा वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे ५,५७५ गावांमधील वीजपुरवठा विस्कळीत झाला होता, तर ३५ लाख ८७ हजार २६१ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला होता.

## 'जनतेला कोरोनाच्या खाईत लोटणाऱ्या मोदींनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा'

**मुंबई (प्रथमेश चव्हाण):** नरेंद्र मोदींनी २०१४ च्या निवडणुकीत जनतेला खोटी स्वप्ने दाखवून सत्ता मिळवली पण सात वर्षात मोदी सरकार सर्व स्तरांवर अपयशी ठरले आहे. कोरोनाची परिस्थिती हाताळण्यातही मोदी सरकार सपशेल अपयशी ठरले आहे. पहिल्या लाटेत नमस्ते ट्रम्पच्या आयोजनात व्यस्त राहिले आणि परिस्थिती अंगलट येताच तबलीगीच्या नावावर कोरोनाचे खापर फोडून धार्मिक रंग देण्याचा उद्योग केला तर दुसऱ्या लाटेतही कोरोनाचे रुग्ण व मृत्यू वाढत असताना मोदी सरकार विधानसभेच्या प्रचारात दंग होते. मोदींनी आपल्या मनमानी कारभाराने १३० कोटी जनतेला कोरोनाच्या खाईत लोटले, त्यांना सत्तेवर राहण्याचा नैतिक अधिकार राहिलेला नसून त्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

मोदी सरकारच्या सात वर्षांच्या काराभाराचा निषेध करण्यासाठी काँग्रेसने रविवारी जिल्हा-तालुका स्तरावर काळ्या फिती लावून निदर्शने केली तसेच मोदी सरकारचा निषेध केला. यावेळी मुंबईत प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष आ. भाई जगताप, प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष चंद्रकांत हंडोरे, नसीम खान, मुंबई काँग्रेसचे कार्याध्यक्ष चरणसिंग सप्रा, प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते डॉ. संजय लाखे पाटील, मुंबई काँग्रेसचे सरचिटणीस संदेश कोंडविलकर यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी नाना पटोले यांनी पत्रकारांशी संवाद साधला. नाना पटोले म्हणाले की, मोदी सरकार हे सर्व पातळ्यांवर अपयशी ठरले आहे. महागाई प्रचंड वाढल्याने लोकांना जगणे कठीण झाले आहे. पेट्रोल, डिझेल, एलपीजी गॅस, खाद्यतेल सामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहे. बेरोजगारी प्रचंड वाढली आहे. अर्थव्यवस्था रसातळाला गेली आहे. कोरोना महामारीत तर मोदी सरकारने अत्यंत बेजबाबदारपणा केला. लाखो लोक ऑक्सिजन, औषधांअभावी मरण पावले. जानेवारी २०२१ मध्येच लसीचे नियोजन केले असते तर लसीसाठी लोकांना रांगा लावाव्या लागल्या नसत्या पण १३० कोटी जनतेचा विचार करुन त्या प्रमाणात लसींची मागणीच केली नाही. नंतर पाकिस्तानसारख्या देशाला मोफत लस वाटली आणि देशातील जनतेला वाऱ्यावर सोडले. खासदार राहुल गांधी म्हणाले होते की, मोदी सरकार हे सुटबुटवाल्यांचे सरकार आहे. आता तर हे



फक्त पैसेवाल्यांचे पंचतारांकित सरकार आहे हे सिद्ध झाले आहे. कोरोना लसीसाठी श्रीमंतांना पंचतारांकित ट्रीटमेंट दिली जात आहे आणि दुसरीकडे गरीबांना मात्र लसीसाठी रांगेत ताटकळत उभे रहावे लागत आहे. सामान्य जनतेला रांगेत उभे करणे हेच मोदींचे धोरण आहे, असे नाना पटोले म्हणाले.

सहा महिन्यापासून शेतकरी दिल्लीच्या सीमेवर आंदोलन करत आहे. पण मोदींना त्यांच्याकडे लक्ष द्यायला वेळ नाही. शेतकरी, कामगार, कष्टकरी जनतेला देशोधडीला लावले. स्वातंत्र्यानंतर देश उभा करण्यासाठी पंडित जवाहरलाल नेहरु यांच्यापासून डॉ. मनमोहनसिंह यांच्यापर्यंत ७० वर्षात देशाच्या प्रगतीसाठी, विकासासाठी अपार मेहनत घेऊन देश उभा केला. पण मोदींनी आपल्या मुठभर उद्योगपती मित्रांसाठी रेल्वे, विमानतळ, बंदरे, बीएसएनएल, एलआयसी, पेट्रोलियम कंपन्या, बँका हे सर्व विकायला काढली. देश अधोगतीकडे घेऊन जाणाऱ्या मोदी सरकारचा काँग्रेसने काळा दिवस पाळून निषेध केला, असेही नाना पटोले यांनी सांगितले.

## काँग्रेसच्याच पुण्याईवर देश चालतोय, मोदी सरकारला आत्मचिंतनाची गरज; संजय राऊतांचा घणाघात

**मुंबई (विशाल कारंडे)-** केंद्रातील मोदी सरकारला आज सात वर्ष पूर्ण झाली आहेत. याच पार्श्वभूमीवर शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांना मोदी सरकारच्या आजरवच्या कामगिरीबाबत विचारण्यात आलं असता त्यांनी मोदी सरकारला आत्मचिंतानाची गरज असल्याचं वक्तव्य केलं आहे. देश काँग्रेसच्याच पुण्याईवर तरला आहे असं सांगताना राऊत यांनी मोदी सरकारला आणखी मेहनत घ्यायची गरज असल्याचं म्हटलं आहे. ते मुंबईत प्रसारमाध्यमांशी संवाद साधत होते. 'मोदी सरकारला सात वर्ष पूर्ण झाली आहेत ही चांगलीच गोष्ट आहे. गेली दोन वर्ष तर कोरोनामध्येच गेली. पण आपण जर नीट अभ्यास केला तर लक्षात येतं की नेहरुंपासून ते अगदी मनमोहन सिंग यांच्यापर्यंत देश काँग्रेसेच्याच पुण्याईवर चालतोय. काँग्रेसनं राबवलेल्या योजना आजही आपण पाहत



आहोत. त्यामुळे मोदी सरकारनं आत्मचिंतन करण्याची गरज आहे आणि आणखी मेहनत घेण्याची गरज आहे', असं संजय राऊत म्हणाले.

'केंद्रात गेल्या सात वर्षांपासून मोदींचं सरकार आहे पण अनेक कामं प्रलंबित आहेत. देशातील जनतेच्या अपेक्षा काही जास्त नाहीत. त्यांना अदानी, अंबानी, टाटा, बिरला व्हायचं नाहीय.

## हॉटेल व्यावसायिकांच्या मागण्यांवर योग्य तो निर्णय घ्या

**मुंबई (नितीन देवळेकर)-** करोनाच्या पार्श्वभूमीवर लागू के लेल्या कठोर टाळेबंदीमुळे व्यवसाय ठप्प झाल्याची बाब विचारात घ्यावी आणि कर्ज फेडण्याच्या अवधीसह विविध प्रकारच्या कर आकारणीबाबत दिलासा द्यावा या हॉटेल व रेस्टॉरंट मालकांच्या मागण्यांच्या निवेदनावर योग्य तो निर्णय घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिले आहेत. पुण्यातील ५०० हॉटेल आणि रेस्टॉरंट व्यावसायिकांच्या 'युनायटेड हॉस्पिटीलिटी असोसिएशन'ने उच्च न्यायालयात याचिका केली होती. तसेच आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत कर्ज फेडण्याच्या कालावधीसह विविध कर आकारणीत दिलासा देण्याची मागणी केली होती.

न्यायमूर्ती के. के. तातेड आणि न्यायमूर्ती नितीन बोरकर यांच्या खंडपीठासमोर नुकतीच या प्रकरणी सुनावणी झाली. त्या वेळी गेल्या वर्षी टाळेबंदी आणि आता करोनाच्या दुसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर लागू कठोर निर्बधांमुळे व्यवसाय पूर्णपणे ठप्प असून मोठ्या



प्रमाणात आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. त्यामुळेच आपल्या मागण्यांसंदर्भात दिलासा देण्याची विनंती करणारे निवेदन एप्रिल महिन्यात अर्थ मंत्रालयाकडे करण्यात आले होते. मात्र त्यावर काहीच प्रतिसाद देण्यात आलेले नाही. त्यामुळे याचिका करण्यात आल्याचे संघटनेतर्फे न्यायालयाला सांगण्यात आले.

न्यायालयानेही त्यांच्या याचिकेची दखल घेत अर्थ मंत्रालय आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाला याचिकेवर उत्तर दाखल करण्याचे आदेश जिले. तसेच अर्थ मंत्रालयाने संघटनेच्या निवेदनावर योग्य तो निर्णय घेण्याचेही स्पष्ट केले. अशाच प्रकारच्या मागण्यांबाबतचे निवेदन हॉटेल आणि रेस्टॉरंट मालकांनी राज्याच्या उत्पादन शुल्क विभागाकडेही के ले होते. मात्र त्यांच्याकडूनही काहीच प्रतिसाद न मिळाल्याने उच्च न्यायालयात याचिका करण्यात आली होती. त्यावरील सुनावणीच्या वेळी संघटनेच्या मागण्यांच्या निवेदनावर योग्य तो निर्णय घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाच्या अन्य खंडपीठाने उत्पादन शुल्क विभागाला दिले. न्यायालयाने उत्पादन विभागाला त्यासाठी चार आठवड्यांची मुदतही दिली आहे.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग (सा.बां.वि.), यांचे कार्यालय** ☎ २२०१६९७५ / २२०१६९७३

Email : presidency.ee@mahapwd.com

**ई-निविदा सूचना क्र. ७ सन २०२१-२२**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई-०१ (दूरध्वनी क्रमांक- २२०१६१७५ /७७) हे सक्षम व अनुभवी कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | राजभवन मुंबई येथील जलभुषण बंगला पुर्नबांधणी करणे (फर्निचर व अंतर्गत सजावट करणे) | ६,८५,५१,५५५/- |

ई-निविदा उपलब्ध : दि. ३१/०५/२०२१ ते दि. १४-६-२०२१पर्यंत

निविदा पूर्व बैठक दि.: ८-६-२०२१ (बैठकिचे ठिकाणी मुख्य अभियंता यांचे कार्यालय ४ बांधकाम भवन, २४ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ वेळ: ३.०० वाजता)

ई-निविदा उघडणे : दि. १५/०६/२०२१ रोजी ३.०० वाजता

निविदा सूचनेमध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुद्धीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात येणार नाही. त्याबाबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिद्ध केले जाईल.

खालील संकेतस्थलावरून ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

1) http://mahapwd.com 2) http://mahatenders.gov.in

(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत सल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल)

३. कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बा.) विभाग, फोर्ट, मुंबई कार्यालयातील सूचना फलक

जा. क्र.इशवि/नि.लि./४९८६

कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला, बांधकाम भवन
२५ मर्झबन रोड, फोटो, मुंबई- ४०० ००१.
दिनांक : २४/०५/२०२१

कार्यकारी अभियंता
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग
मुंबई- ४०० ००१

**डीजीआयपीआर/ २०२१-२०२२/६३६**

# कोरोना संबंधित वस्तूंवर जीएसटी माफीसाठी केंद्रीय वित्त मंत्रालयाकडून मंत्रिगट स्थापन; सदस्यपदी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची नियुक्ती

**मुंबई (विशाल पाटील)- कोरोना संबंधित औषधे, प्रतिबंधित लसी, वैद्यकीय उपकरणे, आवश्यक वस्तूंवर 'जीएसटी'त माफी, सवलत देण्याची आग्रही मागणी उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी झालेल्या ४३ व्या जीएसटी परिषदेत केली होती. या मागणीची तात्काळ दखल घेत याबाबतचा निर्णय घेण्यासाठी केंद्रीय वित्त मंत्रालयाने परिषद झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी देशभरातील आठ राज्यांच्या मुख्यमंत्री अथवा वित्तमंत्र्यांची समिती स्थापन केली आहे. या समितीत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.**

ही समिती जीएसटी माफी, सवलती देण्याची आवश्यकता लक्षात घेऊन ८ जून रोजी आपला शिफारस अहवाल सादर करणार आहे. त्यानंतर यावर केंद्रीय वित्त मंत्रालय अंतिम निर्णय घेणार आहे. कोरोना महामारीशी सामना करताना देशभरातील राज्य सरकारांसह, नागरिकांना दिलासा देण्यासाठी कोरोना संबंधित औषधे, प्रतिबंधित लसी, वैद्यकीय उपकरणे, आवश्यक साहित्याला 'जीएसटी' करातून सवलत देण्याची आग्रही मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जीएसटी परिषदेत केली होती. त्यांच्या या मागणीला देशातील इतर राज्यांनीही जोरदार समर्थन दिले होते. या मागणीची केंद्रीय वित्त मंत्रालयाने तात्काळ दखल घेत हा प्रश्न सोडविण्यासाठी परिषदेच्या दुसऱ्याच दिवशी मंत्रिगट समितीची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. या आठ सदस्यीय समितीत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांची सदस्य म्हणून निवड झाली आहे. मेघालयचे मुख्यमंत्री कॉनराड संगमा यांच्या संयोजनाखाली ही समिती आपला अहवाल तयार करणार असून दि. ८ जूनपर्यंत तो केंद्राकडे सादर करण्यात येणार आहे. समितीच्या अहवालावरुन या केंद्र सरकार यावर अंतिम निर्णय घेणार आहे. या समितीत संयोजक म्हणून मेघालयचे मुख्यमंत्री कॉनराड संगमा असून सदस्य म्हणून गुजरातचे उपमुख्यमंत्री



नितीनभाई पटेल, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार, गोव्याचे मंत्री मौविन गोडीन्हो, केरळचे अर्थमंत्री के.एन. बालागोपाल, ओडीसाचे अर्थमंत्री निरंजन पुयारी, तेलंगणाचे अर्थमंत्री हरीश राव, उत्तर प्रदेशचे अर्थमंत्री सुरेश खन्ना यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हा स्थापन करण्यात आलेला मंत्रिगट कोरोना औषधांवर 'जीएसटी' सवलतीच्या आवश्यकतेची तपासणी करेल तसेच त्यावर शिफारस करेल. यामध्ये कोविड प्रतिबंधित लस, औषधे, कोविड उपचारांसाठी औषधे, कोविड तापसणी किट, मेडिकल ग्रेड ऑक्सिजन, पल्स ऑक्सिमीटर, हँड सॅनिटायझर्स, ऑक्सिजन थेरपी उपकरणे, ऑक्सिजन कॉन्सेन्ट्रेटर, ऑक्सिजन जनरेटर, व्हेंटिलेटर, पीपीई किट्स, एन ९५ मास्क, सर्जिकल मास्क, तापमान तपासणी उपकरणे यांच्यासह कोविड विरुध्दच्या लढ्यासाठी आवश्यक असलेल्या इतर वस्तूंचा समावेश आहे. ही समिती आपला अहवाल दि. ८ जून पर्यंत केंद्रिय वित्त मंत्रालयाला सादर करेल. या अहवालाचे अवलोकन करुन केंद्र सरकार अंतिम निर्णय घेणार आहे. कालच्या जीएसटी परिषदेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, कोविडविरुद्धची लढाई राज्यांना आर्थिकदृष्ट्या सुसह्य होण्यासाठी कोविडसंदर्भात उपयोगात येणारी औषधे, लस, वैद्यकीय उपकरणे, आरोग्यविषयक सेवा आदींवर आकारल्या जाणाऱ्या जीएसटीवर अधिकाधिक सवलत देण्यात यावी. मेडिकल ग्रेड ऑक्सिजन, ऑक्सिजन ऑक्सिमीटर, पल्स ऑक्सिमीटर, कोविड टेस्टिंग किट्स आदी वस्तूंची ग्राहकांकडून परस्पर खरेदी होते. या वस्तूंनाही जीएसटी करात सवलत मिळावी. छोट्या करदात्यांसाठी विचारपूर्वक सुलभ करप्रणाली आणावी.

## कोविडचा मुकाबला सक्षमपणे करण्यासाठी ऑक्सीजन पुरवठ्यास प्राधान्य द्या - मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

**रत्नागिरी (अमोल गुडेकर):** कोविडचा मुकाबला सक्षमपणे करण्यासाठी नवी कोविड केंद्र उभारुन बेडस् व रुग्णसुविधेसाठी ॲम्ब्युलन्स आदि सुविधांसोबत सर्वाधिक लक्ष ऑक्सीजनच्या उपलब्धतेवर



द्यावे आणि शक्य त्या ठिकाणी ऑक्सीजन निर्माणीस प्रारंभ करावा, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज दिले. रत्नागिरी शहरातील महिला रुग्णालयातील समर्पित कोविड रुग्णालयाच्या २०० खाटांचा दुसरा टप्पा आणि राजापूर तालुक्यातील ओणी येथील ३० खाटांच्या समर्पित कोविड रुग्णालयाचे ऑनलाईन लोकार्पण मुख्यमंत्री ठाकरे यांच्या हस्ते झाले यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमास रत्नागिरीचे पालकमंत्री ॲड अनिल परब, राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, जिल्हा परिषद अध्यक्ष विक्रांत जाधव, खासदार विनायक राऊत, आमदार भास्कर जाधव तसेच आमदार राजन साळवी आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

## गॅसचा काळा बाजार करणाऱ्या त्रिकुटाला अटक, गुन्हे शाखेच्या युनिट तीनची कामगिरी

**मुंबई (दिपेश गोरिवले)-** मोठ्या सिलेंडरमधील गॅस नॉबच्या साहाय्याने काढून छोट्या टाकीत भरून विक्री करणाऱ्या तिघांना गुन्हे शाखेच्या युनिट तीनने अटक केली. त्यांच्याकडून ९ मोठे गॅस सिलेंडर, २२ लहान टाक्या, वजनी काटे, रोकड असा ४९ हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला. शब्बीरउद्दीन बडेसाहेब अलालखान ३८, रा. मार्केटयार्ड, बालाजी सतीश गावलगडदे २३ आणि प्रसाद तानाजी फावडे २३, दोघेही रा. स्वारेगट अशी अटक वे केलेल्यांची नावे आहेत. गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असताना, स्वारगेट परिसरातील अंबिका झोपडपट्टीत गॅसचा



काळाबाजार करण्यात येत असल्याची माहिती पोलीस अंमलदार विल्सन डिसोझा यांना मिळाली. त्यानुसार पथकाने घटनास्थळी छापा टाकला असता तिघेजण मोठ्या टाकीतून छोट्या टाकीत गॅस भरताना आढळूले. त्यानुसार पथकाने पुरवठा अधिकाऱ्यांच्या मदतीने तिघांना ताब्यात घेतले. त्या ठिकाणाहून ४९ हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला. ही कामगिरी पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता, सहायक पोलीस निरीक्षक अमृत चवरे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे, संतोष क्षीरसागर, रामदास गोणते, सुजीत पवार, एकनाथ कंधारे, संदीप तळेकर, कल्पेश बनसोडे, सोनम नेवसे, भाग्यश्री वाघमारे यांच्या पथकाने केली.

## दिव्यांगांना राजकीय प्रतिनिधित्व कधी मिळणार?

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)-** सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, वैज्ञानिक, सांस्कृतिक, क्रीडा अशा अनेक क्षेत्रांमध्ये दिव्यांगांनी आपल्या कतृत्वाचा ठसा उमटवला आहे. शासन कल्याणकारी राज्यांमध्ये या घटकासाठी अनेक कल्याणकारी योजना राबवत आहेत. त्यातील अनेक योजना फक्त कागदावर असल्याचं चित्र आहे. त्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होताना दिसत नाही. तरीही आपल्या जीवनातील संकटावर हे दिव्यांग बांधव संघर्षाने मात करत असतात.

समाजातील मुख्य प्रवाहामध्ये येण्यासाठी दिव्यांग व्यक्ती सतत प्रयत्नशील असतात. सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, वैज्ञानिक, सांस्कृतिक, क्रीडा अशा अनेक क्षेत्रांमध्ये दिव्यांगांनी आपल्या कतृत्वाचा ठसा उमटवला आहे. शासन कल्याणकारी राज्यांमध्ये या घटकासाठी अनेक कल्याणकारी



योजना राबवत आहेत. त्यातील अनेक योजना फक्त कागदावर असल्याचं चित्र आहे. त्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होताना दिसत नाही. तरीही आपल्या जीवनातील संकटावर हे दिव्यांग बांधव संघर्षाने मात करत असतात. दिव्यांगाचे अनेक प्रश्न फक्त कागदावरच आहेत. अनेक योजना फक्त नावालाच आहेत. याचं कारण म्हणजे गेल्या ६० ते ७० वर्षात न मिळालेलं राजकीय प्रतिनिधित्व. लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद सोडून द्या साधं ग्रामपंचायतचं तिकिट देखील राजकीय पक्ष देत नाही. त्यामुळे तोंड देखल्यागत योजना राबवल्या जातात. आणि गरजूवंत या योजनांपासून वंचित राहतात. त्यामुळे आमच्या मागण्या मांडण्यासाठी आमचाच प्रतिनिधी असावा अशी मागणी दिव्यांग संघटनांच्या वतीने केली जात आहे.

एवढ्या मोठ्या लोकसंखेचा एकही प्रतिनिधी भारताच्या संसदेत आणि राज्यांच्या विधिमंडळात नसणे. ही गोष्ट अपंग नागरिकांवर केवळ अन्यायच करणारी नाही. तर त्यांच्या नागरी हक्कांचा संकोच करणारी आहे. अपंग समाज घटक हा अल्पसंख्यांक तर आहेच पण त्याहीपेक्षा अधिक समस्याग्रस्त आहे. असे असतानाही आजवर अपंगांच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा विचार कोणत्याही महान राजकीय व्यक्तीच्या मनातही येऊ नये ही गोष्ट खूपच वेदनादायक आहे.

## पवईत उद्योजकांची फसवणूक; तब्बल पाच कोटींना घातला गंडा, चौघांवर गुन्हा दाखल

**मुंबई (सम्यक कासारे)-** पवईतील काही उद्योजक मित्रांना ठाण्यातील तीन बांधकाम व्यावसायिकांनी तब्बल पाच कोटी रुपयांना गंडा घातल्याची माहिती उघडकीस आली आहे. गुंतवणुकीच्या बहाण्याने ही फसवणूक करण्यात आली असून याप्रकरणी ठाण्यातील नौपाडा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली आहे. या आरोपींमध्ये मंत्रालयातील एका बडतर्फ अधिकाऱ्याचादेखील समावेश असल्याची माहिती यावेळी समोर आली आहे. पवईत राहणाऱ्या चंद्रशेखर



मुरलीधर गांधी यांना २०१७ साली त्यांचे मित्र केतन पटेल यांच्या ओळखीने मंत्रालयातील नगरविकास खात्यातील अधिकारी त्रिंबक ऊर्फ दीपक कासार यांनी एका व्यवसायात गुंतवणुकीची ऑफर देऊ केली. ज्यात कासार यांच्या ओळखीचे नियती लॅण्डमार्क आणि इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. चे संचालक नितीन बापू देसाई आणि त्यांच्या पत्नी मंजुषा नितीन देसाई तसेच समर्थ इंटरप्रायझेसचे प्रोप्रायटर शेखर शंकर सोनार यांना व्यवसायात गुंतवणूक करण्यास सांगण्यात आले. गुंतवणूकदारांनी २६ सप्टेंबर २०१७ रोजी गांधी आणि केतन पटेल नौपाडा येथील उत्सव हॉटेल येथे वरील तिघांना भेटायला गेले. यात गुंतवणूक केल्यास तुम्हाला दामदुप्पट फायदा होईल. जास्तीत जास्त गुंतवणूक करा, असे सांगत देसाई व सोनार यांनी केलेल्या सरकारी कामाचे ६.३ कोटी रुपये नगरविकास खात्यातून त्यांना देणे आहे. ते पैसे लवकरच माझ्या सहीने मंजूर होणार असल्याने तुमच्या पैशांची जबाबदारी मी घेतो असे सांगितले.

## रेल्वे परिसरातील फेरीवाल्यांकडून हप्ता वसुली, खंडणी उकळणाऱ्या टोळीच्या म्होरक्यासह पत्नी व साथीदार गजाआड

**मुंबई- रेल्वे हद्दीतील फेरीवाल्यांकडून जबरदस्ती हप्ता वसुली करून पत्नीच्या नावे कोट्यवधी रुपयांची संपत्ती बनविणारा सराईत गुन्हेगार बबलू ठाकूर याच्या मुसक्या आवळल्यानंतर दादर रेल्वे पोलिसांनी आता त्याची पत्नी आणि अन्य साथीदारांना गजाआड केले आहे.**

खंडणी मागतो तसेच वारंवार धमकावतो म्हणून अन्सारी नावाच्या फेरीवाल्याने तक्रार दिल्यानंतर दादर रेल्वे पोलिसांनी रेकॉर्डवरचा गुन्हेगार संतोषकुमार रामप्रताप सिंग ऊर्फ बबलू ठाकूर याचा शोध सुरू केला होता. वरिष्ठ निरीक्षक ज्ञानेश्वर काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय घनवट व त्यांचे पथक बबलूचा शोध घेत असताना तो गोवंडी येथे आला असून तेथे काही लोकांना भेटल्यानंतर निघून जाणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार घनवट व त्यांच्या पथकाने गोवंडी गाठली. पण पोलीस आल्याची कुणकुण लागताच बबलूने त्याच्या अन्य दोघा साथीदारांसह तेथून गाडीने पळ काढला. तेव्हा पोलिसांनी दुचाकीवरून पाठलाग करीत अखेर मुलुंड टोलनाका येथे



बबलू आणि त्याचे दोन साथीदार समीर वालझरे आणि दीपाली कामठे यांना पकडले. तेव्हा त्यांच्या कारमध्ये वंचित बहुजन आघाडी या पक्षाचे कोरे लेटरहेड सापडले तसेच बबलूसोबत असलेल्या दोघांनी ते वंचित बहुजन पक्षाचे कार्यकर्ते असल्याचे सांगितले. अधिक चौकशीत ते दोघे बबलूच्या टोळीतले असून ते बबलूला गुह्यात वेगवेगळ्या मार्गाने मदत करीत असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे बबलूसह त्या दोघांनाही पकडण्यात आले.

बबलूने त्याची पत्नी रिटा हिच्या नावावर खंडणीच्या पैशातून कोट्यवधीची संपत्ती बनवल्याची माहिती मिळताच पोलिसांनी रिटाचा शोध सुरू केला. शिवाय रिटा हीदेखील अन्सारीला हप्त्यासाठी धमकावत होती. त्यामुळे एपीआय घनवट व त्यांच्या पथकाने वारंवार जागा बदलून लपणाऱ्या रिटाला जुईनगर येथे पकडले. तिला पकडून पोलीस ठाण्यात नेत असताना तिने फलाट क्रमांक चारवर लोकल येत असल्याचे पाहून महिला कॉन्स्टेबलचा हात झटकला आणि पळून जाण्यासाठी ट्रकवर उडी टाकली, मात्र प्रसंगावधान दाखवत एपीआय घनवट यांनीदेखील लोकल येत असतानाही ट्रकवर उडी टाकून रिटाला पकडले. रिटाने स्वतःसह पोलिसांचा जीव धोक्यात आणला होता.

## बीकेसी पोलिसांची उत्तम कामगिरी

### ६० हजार रुपयांचा मोबाईलचा तातडीने तपास करून शोधला

**मुंबई प्रतिनिधी (दिपेश गोरीवले):** बि.के.सी. पोलीस ठाण्याच्या हद्दिमध्ये दि. २९ मे २०२१ रोजी रात्रौ १० वाजून ५५



मिनिटांच्या दरम्यान फैसल अल्ताप मेमन हे ऑटो रीक्षाने बांद्रा ते कुर्ला प्रवास करीत असताना प्रवासादरम्यान मेमन यांचा ॲपल कंपनीचा I Phone -11 गहाळ झाला. मेमन यांनी मोबाईल शोधण्याचा खुप प्रयत्न केला मात्र सांपडून आला नाही. त्यानंतर मेमन यांनी नजीकच्या बि.के.सी. पोलीस ठाण्यामध्ये मोबाईल हरवल्याची तक्रार दिली असता तात्काळ पोलीस निरीक्षक शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाने पोलीस उप निरीक्षक प्रदिप आहिरे, पो. हवालदार पवार, पो,ना. होळकर, पो. शिपाई डुकरे, भालेराव, महिला पो. शिपाई जाधव सर्व मिळून सर्च ऑपरेशन राबवत सी.सी.टि.व्हि. फुटेजच्या मदतीन तात्काळ मेमन यांना महागडा ॲपल कंपनीचा I Phone -11 रु.६०,००० किमतीचा फोन शोधून दिला. शोध कार्यात सहभागी सर्व पोलीस अधिकारी यांचे मेमन यांनी आभार मानले.

## जादा दराने रेमडिसिव्हरी इंजेक्शनची विक्री करणाऱ्या तरुणाला अटक

**मुंबई (जसबीरकौर भामरा)-** कायदेशिररित्या रेमडीसिव्हर इंजेक्शन मिळवून जादा दराने इंजेक्शनची विक्री करणाऱ्या तरुणाला अमली पदार्थविरोधी पथक एकने अटक केले. त्याच्याकडून दोन इंजेक्शन जप्त करण्यात आली आहेत. शनिवारी पावणेचार वाजण्याच्या सुमारास वडगाव बुद्रूक परिसरात कारवाई करण्यात आली. विशात अनंता मोरे (२८, रा. जाधवनगर, आंबेगाव बुद्रूक) असे अटक केलेल्याचे



नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रेमडीसिव्हीर इंजेक्शन बेकायदेशीर मार्गाने मिळवून विशाल मोरे एकाला विक्री करणार असल्याची माहिती अमली पदार्थविरोधी पथकाला मिळाली होती. त्यानुसार पथकाने काल दुपारी पावणेचार वाजण्याच्या सुमारास सिंहगड रस्त्यावर वडगाव बुद्रूक परिसरात सापळा रचून विशालला अटक केले. त्याच्याकडून दोन रेमडीसिव्हर इंजेक्शन जप्त करण्यात आले आहेत.



## आईला रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी दोन भावांची धडपड

**मुंबई (नितीन देवळेकर)-** कोरोनाच्या महामारीत अनेकांचे व्यवसाय ठप्प पडले आहे, त्यामुळे आर्थिक गणित बिघडल्याने गरजेच्या गोष्टींचा सुद्धा पूर्ण करता येत नाही. औरंगाबादच्या दोन सख्या भावांवर अशीच वेळ आली आहे. आईला रुग्णालयात उपचारासाठी नेण्यासाठी हतबल झालेल्या, मुलांची ही व्यथा डोळ्यात पाणी आणणारी आहे. आईला कर्करोगाचे निदान झाले. त्यातच पॅरेलिसिसमुळे हालचाल करणेही अशक्य झाले. अशा परिस्थितीत आईला रुग्णालयात नियमितपणे घेऊन जावे लागते. मात्र प्रत्येकवेळी रुग्णवाहिकेचं भाडं भरणे अश्यक्य असल्याने हतबल झालेल्या आधुनिक श्रावण बाळांनी आईला रुग्णालयात नेण्यासाठी दुचाकीला जोडणारी लोखंडी हातगाडी तयार केली. शनिवारी आईला रुग्णालयात घेऊन जाताना हे दोन्ही भाऊ क्रांतीचौकातून पैठणगेटच्या रस्त्यावर पोहोचले, पण अचानक हातगाडीचे चाक मोडले. त्यामुळे रणरणत्या उन्हात या स्थितीत भररस्त्यावर थांबावे लागले,पण काही लोकांनी परिस्थिती जाणून घेऊन ॲम्बुलन्सची सोय करून दिली. मात्र, आज मिळाली ॲम्बुलन्स प्रत्येकवेळी मिळणार नाही, त्यामुळे पुढील प्रवास पुन्हा हातगाडीच्या चाकासोबतच असणार आल्याचं दुःख या दोन्ही भावांच्या तोंडावर जाणवत होता.

## केरळात मान्सूनचे आगमन किंचित लांबणीवर; महाराष्ट्रात कधी पोहोचणार?

**मुंबई (दिपेश गोरिवले)- भारतीय हवामान विभागाने मान्सूनची प्रतीक्षा कायम असल्याचे सांगितले असतानाच, खासगी हवामान संस्थांनी मात्र केरळमध्ये मान्सून दाखल झाल्याचे म्हटले आहे. यामुळे सामान्य माणूस नेहमीप्रमाणे गोंधळात पडला आहे. स्कायमेट या संस्थेने रविवारी ३० मे रोजी मान्सून भारतात दाखल झाल्याचे जाहीर केले. तर भारतीय हवामान विभागाने ३ जूनपर्यंत मान्सून केरळात दाखल होईल, असा अंदाज वर्तवला आहे.**

केरळमध्ये ३० मे रोजी मान्सून धडकेल, असा अंदाज स्कायमेटने वर्तवला होता. स्कायमेटने दिलेल्या माहितीनुसार, मान्सून आगमनाचे निष्कर्ष पूर्ण झाले असून, केरळच्या बहुतांश भागामध्ये मान्सूनपूर्व पाऊसही जोरदार होता. मान्सूनच्या आगमनाच्या वेळी मात्र, परिस्थिती पूर्ण अनुकूल नसल्याने त्याचा प्रभाव कमी असल्याचे स्कायमेटने स्पष्ट केले आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यात निर्माण होणाऱ्या चक्रीय वात स्थितीमुळे मान्सूनच्या प्रगतीला अधिक चालना मिळेल, असा अंदाज असल्याचेही स्कायमेटने म्हटले आहे. भारतीय हवामान विभागाने मात्र २७ मेपासून मान्सून श्रीलंकेमध्येच रखडला असल्याचे स्पष्ट केले. हवामान विभागाने जारी केलेल्या अंदाजानुसार १ जूनपासून नैऋत्य मौसमी वाऱ्यांना चालना मिळेल, असा अंदाज आहे. त्यामुळे केरळमध्ये पावसाची व्यापकता वाढू शकेल. त्यानंतर ३ जून रोजी मान्सून देशात दाखल होईल, अशी शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. दरम्यान, मेमध्ये हवामान



विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार ३१ मे रोजी मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता होती. केरळमध्ये मान्सून दाखल झाल्याचे जाहीर करण्यासाठी १४ केंद्रांपैकी ६० टक्के केंद्रांवर दोनदिवस २.५ मिलीमीटर किंवा त्याहून अधिक पावसाची नोंद होणे गरजेचे आहे. तसेच पश्चिमी वाऱ्यांची उंची, वाऱ्यांचा वेग आदी निकष पूर्ण होणे गरजेचे आहे. स्कायमेटने दिलेल्या माहितीनुसार, बहुतांश निकष पूर्ण झाले असून, २९ आणि ३० मेच्या पावसाची आकडेवारीही जारी केली आहे. प्रादेशिक हवामान विभागाच्या अधिकाऱ्यांनी मात्र हे निकष पूर्ण झाले नसल्याचे स्पष्ट करत, सध्या वारे पुरेसे सक्रिय नसल्याचे सांगितले. यामध्ये चक्रीवादळामुळे काही प्रमाणात बाष्प खेचले जाते. मात्र, मान्सूनच्या विलंबासाठी केवळ चक्रीवादळ हे कारण नसल्याचेही सांगण्यात येत आहे.मुंबईत किमान तापमान आणि आर्द्रतेमध्ये वाढ झाल्याचे दिसत आहे. रविवारी आभाळही ढगाळ होते.

## केशरी शिधापत्रिकाधारकांना जून महिन्यासाठी सवलतीच्या दराने अन्नधान्याचे वितरण

**मुंबई (राजेश गायकवाड)-** ठाणे शिधावाटप क्षेत्रात राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांना माहे जून २०२१ करिता सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ देण्यात येणार असल्याची माहिती मुंबईचे शिधावाटप नियंत्रक व नागरी पुरवठा संचालक कैलास पगारे यांनी दिली. राज्यातील कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांना माहे मे- २०२० ते ऑगस्ट २०२० या चार महिन्याच्या कालावधीकरीता सवलतीच्या दराने गहू रुपये ८/- प्रति किलो व तांदूळ रुपये १२ प्रति किलो प्रतिमाह प्रतिव्यक्ती



३ किलो गहू व दोन किलो तांदूळ याप्रमाणे ५ किलो अन्नधान्याचा सवलतीच्या दराने लाभ देण्यात आला आहे. या योजनेतील अधिकृत शिधावाटप दुकानामध्ये शिल्लक असलेल्या अन्नधान्याचे वाटप एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांना प्रतिमाह प्रतिव्यक्ती १ किलो गहू व १ किलो तांदूळ याप्रमाणे २ किलो अन्नधान्य माहे जून २०२१ करिता गहू रुपये ८ प्रतिकिलो व तांदूळ रुपये १२ प्रतिकिलो या सवलतीच्या दराने वितरण करण्यात येईल. एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांपैकी जे शिधापत्रिकाधारक अन्नधान्याची प्रथम मागणी करतील त्यांना सवलतीच्या दराने अन्नधान्य वितरण करण्यात येईल. सदर योजनेतील ज्या अधिकृत शिधावाटप दुकानामध्ये सदर योजनेतील अन्नधान्य शिल्लक आहे त्याच शिधावाटप दुकानातून अन्नधान्य वितरण करण्यात येईल.